श्री. संतोष विजय होळकर, परिचर, पं. स.
कोपरगाव यांचेवर विभागीय चौकशी
अहवालानुसार प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जा.क्र.साप्रवि१/आस्था-४/०७-२१/२४१/२०२५
अहिल्यानगर दिनांक २३/६/२०२५

वाचा:- १. या कार्यालयाकडील ज्ञापन क्र. साप्रवि-१/आस्था-४/०७-२१/६०९/२०२१, दि. १०/११/२०२२
२. वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-कोळगांव, ता.श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र. अस्था/वशि/३१२/२०२२, दिनांक ०६/१२/२०२२
३. कार्यालयीन आदेश जा.क्र.साप्रवि/आस्था-४/०७-२१/७४/२०२३ दि १७/०२/२०२३
४. मा.सहाय्यक आयुक्त(चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेडील चौकशी अहवाल क्र.विशा-४/खाचौ/सी.आर.४१/२०२३ दि. ०२/०८/२०२३ प्राप्त दि. २९/११/२०२३
५.कार्यालयीन अंतिम कारणे दाखवा नोटीस जा. क्र. साप्रवि१/आस्था-४/०७२१/३८/२०२५ दि. २२/०१/२०२५
६. कार्यालयीन पत्र जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/१९६/२०२५ दि. ०८/०५/२०२५
७. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र जा. क्र. वशि/आस्था-१/६३०/२०२५ दि. ०९/०५/२०२५
८. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र जा. क्र. आस्था-१/१०१८/२०२५ दि. २०/०५/२०२५

उपरोक्त नमुद विषयानुसार, श्री. संतोष विजय होळकर हे परिचर या पदावर प्रा.आ.कें. कोळगाव, ता.श्रीगोंदा, येथे कार्यरत असताना, दिनांक ०८/०५/२०२२ पासुन कार्यालयास कोणतीही पुर्वकल्पना न देता कार्यालयीन कामी अनाधिकृतपणे गैरहजर राहिल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चे उल्लंघन झालेले आहे. तसेच संदर्भ क्र. १ अन्वये दोषारोपपत्र बजाविण्यात आले असता, संदर्भ क्र. २ अन्वये श्री. होळकर यांनी हा दोषारोप स्वीकारणेस नकार दिला आहे.

यास्तव सदर प्रकरणी चौकशी करणेकामी संदर्भ क्र. ३ नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आलेली होती. संदर्भ क्र. ४ नुसार सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग, नाशिक यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे. विभागीय चौकशी अहवालामध्ये श्री. होळकर यांवर ठेवणेत आलेला आरोप सिध्द होत असल्याचे निष्कर्ष नमुद केले आहे. तथापि श्री. होळकर, परिचर हे प्रा.आ.कें. कोळगाव, ता. श्रीगोंदा, येथे कार्यरत असताना दिनांक ०८/०५/२०२२ पासुन कार्यालयास कोणतीही पुर्वकल्पना न देता कार्यालयीन कामी अनाधिकृतपणे गैरहजर राहिल्याने शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरत आहे.

तसेच श्री. होळकर, परिचर हे तक्रार बदलीने पंचायत समिती कोपरगाव येथे दि. ०३/०३/२०२३ रोजी हजर झाले आहेत. परंतु संदर्भ क्र. ८ अन्वये हजर झालेपासून दि. १२/०४/२०२३ ते ३१/०७/२०२४ या कालावधीत एकूण २६० दिवस व दि. ०१/०८/२०२४ पासुन आज अखेर अनधिकृत गैरहजर आहेत. श्री होळकर,परिचर यांना वारंवार कार्यालयीन कामकाजाकामी अनाधिकृतपणे विनापरवानगी गैरहजर राहणेची सवय असुन त्यांचे कार्यालयीन वर्तनात सुधारणा करणेची संधी देण्यात येवुनही त्यांचे वर्तनात कोणत्याही प्रकारची सुधारणा झालेचे दिसुन येत नाही.

श्री. होळकर, परिचर हे जिल्हा परिषद कर्मचारी असुन सदैव कर्तव्यपरायण व सचोटीने वागणे आवश्यक आहे. तथापि कार्यालयीन कामकाजात कार्यालयीन शिस्तीचे उल्लंघन करुन गैरवर्तन केल्याने श्री. होळकर यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. यास्तव महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( ५ ) नुसार, सक्तीची सेवानिवृत्ती ही शिक्षा का करणेत येऊ नये? याबाबत लेखी खुलासा अंतिम कारणे दाखवा नोटीस मिळालेपासुन १० दिवसाचे आत गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेमार्फत या कार्यालयास सादर करणेबाबत संदर्भ क्र. ५ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु ३ महिने उलटूनही श्री. होळकर यांचा खुलासा प्राप्त न झाल्याने संदर्भ क्र. ७ प्राप्त अहवालानुसार श्री. होळकर, परिचर, पंचायत समिती कोपरगाव यांनी अंतिम कारणे दाखवा नोटीसीचा समर्पक खुलासा आवश्यक त्या दस्ताऐवजासह सादर केलेला नसल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( ५ ) नुसार, सक्तीची सेवानिवृत्ती ही शिक्षा या आदेशाद्वारे अंतिम करण्यात येत असुन सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येवुन सदर आदेशाची नोंद मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक क्रं.२०२५०६२३०४०११० असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 21-06-2025 11:16:28

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री. संतोष विजय होळकर, परिचर, पं. स. कोपरगाव
द्वारा व प्रत:- गट विकास अधिकारी पंचायत समिती कोपरगाव

२/- सदर आदेशाची प्रत संबधीतास बजवून त्याची एका प्रतीवर स्वाक्षरी घेणेत यावी व स्वाक्षरी घेतलेली प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी. तसेच सदर आदेशाची नोंद घेतलेल्या मुळ सेवापुस्तकाची छायांकित प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.